मन उधाण वाऱ्याचे चित्रपट ः अगंबाई अरेच्चा

गायक ः शंकर महादेवन गीत ः गुरू ठाकुर संगीत ः अजय अतुल

मायेच्या हळव्या स्पर्शाने खुलते नात्यांच्या बंधात धुंद मोहरते

मायेच्या हळव्या स्पर्शाने खुलते नात्यांच्या बंधात धुंद मोहरते

मन उधाण वाऱ्याचे गुज पावसाचे

का होते बेभान कसे गहिवरते

मन उधाण वाऱ्याचे गुज पावसाचे

का होते बेभान कसे गहिवरते

मन उधाण वाऱ्याचे

आकाशी स्वप्नांच्या हरपून भान शिरते

हुरहुरत्या सांजेला कधी एकटेच झुलते

सावरते ,बावरते ,घडते, अडखळते का पडते

कधी आशेच्या हिंदोळयावर मन हे वेडे झुलते

मन तरंग होऊन पाण्यावरती फिरते

अन् क्षणात फिरूनी आभाळाला भिडते

मन उधाण वाऱ्याचे गुज पावसाचे

का होते बेभान कसे गहिवरते

मन उधाण वाऱ्याचे

रूणझुणते ,गुणगुणते ,कधी गुंतते हरवते

कधी गहिऱ्या डोळयांच्या डोहात पार बुडते

तळमळते सारखे बापडे नकळत का भरकटते

कधी मोहाच्या चार क्षणांना मन हे वेडे भुलते

जाणते जरी हे पुन्हा पुन्हा का चुकते

भावडे तरी भासांच्या मागून पळते

मन उधाण वाऱ्याचे गुज पावसाचे

का होते बेभान कसे गहिवरते

मन उधाण वाऱ्याचे